# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**

(Established by Government of Maharashtra in the year 1989)

## व्यवस्थापन मंडळ बैठक

## Board of Management Meeting

### कार्यवृत्त

### Minutes of Meeting

**बैठक क्रमांक** : 195
(Meeting Number)

**स्थळ(Venue)** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२
Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : सोमवार, दिनांक 2 सप्टेंबर 2024
**(Day and Date)** : Monday, 2th September 2024

**वेळ** (Time) : सकाळी 11.30 वाजता (11.30 am)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

---

## 195 वी व्यवस्थापन मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची 19 वी बैठक (Online व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दि. 02 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 11.30 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | अध्यक्ष |
| 02 | मा. डॉ.जोगेंद्रसिंह बिसेन, प्र-कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 03 | मा. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री. गर्जे, नाशिक | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 04 | मा. डॉ. संजय घनश्याम भावे, मा. कुलगुरू कोकण कृषी विद्यापीठ, दापोली | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 05 | मा. प्रा. वाल्मिक कचरू सरवदे, प्र-कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ.संभाजी नगर | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 06 | मा. श्री. नरेंद्र अनंतराव जोशी, अंबेजोगाई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 07 | मा. श्री. उदित सेठ, मुंबई | ऑनलाईन उपस्थित | सदस्य |
| 08 | मा. संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी श्री. राजेश मानकर | | सदस्य |
| 09 | मा.डॉ. संजीवनी महाले, संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | सदस्य |
| 10 | मा. डॉ. अनिल प्रभाकर कुलकर्णी, पुणे | | सदस्य |
| 12 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 12 | मा. डॉ. गोविंद कतलाकुटे, वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | | निमंत्रित सदस्य |
| 13 | श्री. दिलीप भरड, कुलसचिव | | सचिव |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. सचिव, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 03 | मा. सचिव, कृषी, मुंबई | सदस्य |
| 04 | मा. संचालक, उच्च शिक्षण, मुंबई | सदस्य |
| 05 | मा. डॉ. संजय चोरडिया, उद्योग, मुंबई | सदस्य |

| अनु.क्रमांक Subject No. | | तपशील Details |
|---|---|---|
| 195.1 | | **स्वागत** — मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य सचिव श्री. दिलीप भरड यांनी ऑफलाईन तसेच ऑनलाईन उपस्थित सर्व सदस्यांचे शब्दसुमनांनी स्वागत केले. नवनामनिर्देशित डॉ. संजीवनी महाले यांचे सदस्य म्हणून प्रथम बैठकीनिमित्त स्वागत करण्यात आले. सर्व उपस्थित सदस्यांनी डॉ. संजीवनी महाले यांचे अभिनंदन केले. |
| 195.2 | 195.2.1 | **दिनांक 18 जुलै 2024 रोजी झालेल्या 194 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**<br>ठराव — दिनांक 18 जुलै 2024 रोजी झालेल्या 194व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त सचिव श्री. भरड यांनी वाचून दाखविले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 195.2.2 | **दिनांक 18 फेब्रुवारी 2024 रोजी झालेल्या 194 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल**<br>**ठराव** - दिनांक 18 जुलै 2024 रोजी झालेल्या 194 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाचे वाचन व्यवस्थापन मंडळाचे सचिव श्री. भरड यांनी केले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 195.3 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 195.3.1<br>ग्रंथालय व माहितीस्रोत केंद्र | **विद्यापीठात असलेल्या ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्राचे नाव बदलून ज्ञान स्त्रोत केंद्र करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** - विद्यापीठ स्थापनेपासून विद्यापीठात ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्र स्थापन करण्यात आलेले आहे. सदर केंद्रामार्फत विविध दुर्मिळ ग्रंथ, नियतकालिके, वाचनसाहित्य वेळोवेळी विद्यार्थ्यांना किंवा समाजाला उपलब्ध करून देत आहे. आज स्वयंचलित आणि इंटरनेटच्या युगातही वाचनसाहित्य आणि ग्रंथालयाद्वारे पुरविल्या जाणाऱ्या सेवांच्या स्वरूपातील बदल |

| | | |
|---|---|---|
| | | लक्षात घेता, सेवा पद्धतींमध्ये झालेल्या बदलांमुळे ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्राचे नाव ज्ञान स्त्रोत केंद्र करण्यास व तेथील ग्रंथपाल या पदाचे संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र करण्याबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर ...<br>**ठराव-** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार इतर विद्यापीठांप्रमाणे ग्रंथालयाचे नाव ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्र बदलून 'ज्ञान स्रोत केंद्र' असे करण्यात यावे असे ठरले. तसेच बदललेल्या 'ज्ञानस्त्रोत केंद्र' या नामाभिधानास मान्यता देण्यात आली तसेच आकृतीबंधामध्ये 'ग्रंथपाल' या पदाच्या सुधारित नामाधिनासाठी शासनाकडून मान्यता घेण्यात यावी अशी शिफारस सर्वानुमते करण्यात आली. |
| | 195.3.2 आस्थापना कक्ष | **श्री. संदीप जयवंत पगारे याचिकाकर्ता (याचिका क्र. 3710/2024) मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर...**<br>**टिपणी** - श्री. संदीप जयवंत पगारे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र. 3710/2024 दाखल केलेली होती. सदर याचिकेच्या निकालानुसार सहायक पदावरील 17 नियुक्त कर्मचाऱ्यांसंदर्भातील साधर्म्य तपासणेकामी विद्यापीठाने 05 सदस्यीय समिती स्थापन केलेली होती. सदर समितीने मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या निकालानुसार अभिलेखांची तपासणी करून मा. कुलगुरू यांना अहवाल सादर केला. सदर अहवाल मा. कुलगुरू यांनी स्विकारला असून मा. व्यवस्थापन मंडळासमोर माहितीस्तव सादर...<br>**ठराव** – या संदर्भात डॉ. अनिल कुलकर्णी सरांनी 17 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीची पार्श्वभूमी सांगून 17 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसाठी शासनाच्या सेवाशर्तीच्या नियमांची अंमलबजावणी करून नियुक्त्या केलेल्या आहेत. 17 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा आधार घेऊन न्यायप्रविष्ट असलेल्या याचिकांसंदर्भात समकक्षता तपासणी समितीने समकक्षता तपासून 17 कर्मचाऱ्यांच्या सेवेत आणि याचिकाकर्त्यांच्या सेवेत साधर्म्य नसल्याचा अहवाल सादर केला. समितीने सादर केलेला अहवाल सर्वानुमते मान्य करण्यात आला व त्या अनुषंगाने श्री. पगारे, शासनास व विद्यापीठाचे विधीज्ञ यांना कळविण्यात यावे तसेच सदर ठराव विद्यापीठाच्या वेबसाईटवर प्रकाशित करण्यात यावा असे सुचित करण्यात आले. |
| | 195.3.3 परीक्षा कक्ष | **परीक्षा मंडळ सभा विषय क्र. 50.4.4 दिनांक 08/05/2024 नोंदणी कालावधी (Registration Period) संपलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेणेबाबत...**<br>**टिपणी** – प्रत्येक शिक्षणक्रम पूर्ण करण्याचा कालावधी हा शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिकेत निश्चित केलेला असतो. प्रत्येक शिक्षणक्रम पूर्ण करण्याचा कालावधी हा वेगवेगळा असतो. कालावधी संपल्यानंतर विद्यार्थी हे पुन्हा प्रवेश/परीक्षा देण्यासंदर्भात विनंती करतात. यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. त्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी |

| | | |
|---|---|---|
| | | प्रस्ताव परीक्षा मंडळाच्या विचारार्थ सादर करण्यात आला होता. परीक्षा मंडळाने खालीलप्रमाणे ठराव केला आहे.<br>सदर विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी हा 2020 पूर्वीचा असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता विशेष बाब म्हणून विद्यार्थ्यांना परीक्षेची संधी उपलब्ध करून द्यावी. यासंदर्भात मार्गदर्शक तत्वे तयार करण्यास मा. कुलगुरू यांनी विद्वत परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे. सदर विषय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**ठराव** — परीक्षेची संधी संपलेल्या विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्याच्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली व संधी संपलेल्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत त्या-त्या वेळी येणाऱ्या अर्जांबाबत निर्णय घेण्याचे सर्वाधिकार मा. कुलगुरूंना असावेत असे सर्वानुमते ठरविण्यात आले. |
| | 195.3.4<br>नियोजन अधिकारी | **School of Development Studies या नवीन विद्याशाखेच्या निर्मितीबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर...**<br>**टिपणी** — विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्राचे राज्य आहे. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात सामाजिक व आर्थिक विकासासाठी ग्रामीण व शहरी भागावर लक्ष केंद्रित करून तेथील विकासासाठी नैसर्गिक संसाधनांचा विकास तसेच वापर करण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करणे आवश्यक आहे. ग्रामीण आणि शहरी लोकसंख्येसाठी सामाजिक, आर्थिक पैलूंसाठी तंत्रज्ञानाचा अभ्यास करून विकास करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याकरीता विद्यापीठात एका स्वतंत्र विद्याशाखा असावी. सदर विद्याशाखेमार्फत झपाट्याने बदलणारे तंत्रज्ञान आणि त्याचा वापर करण्यासाठी विचारमंथन सत्रे, कार्यशाळा आणि प्रशिक्षण घेऊन जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम करता येईल. याकरिता School of Development Studies या विद्याशाखेची स्थापना करण्याचा विचार मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर ...<br>**ठराव** — नवीन विद्याशाखेच्या निर्मितीची संकल्पना आणि गरज मा. कुलगुरूंनी विषद केली. नवीन विद्याशाखा निर्मितीला सर्वानुमते मान्यता दिली. तसेच नवीन विद्याशाखेसाठी लागणारे मनुष्यबळ यासाठी दुरस्थ शिक्षण मंडळाच्या 1 संचालक, 1 सहयोगी प्राध्यापक व 3 सहायक प्राध्यापक अशा विहित संरचनेनुसार शासनाची मान्यता घेऊन पदांची भरती करावी असे सर्वानुमते ठरले. |
| | 195.3.5<br>वित्त विभाग | **दि. 13 ऑगस्ट 2024 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - दि. 13 ऑगस्ट 2024 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर.... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** — विद्यापीठाच्या वित्त अधिकाऱ्यांनी 13 ऑगस्ट 2024 रोजी झालेल्या बैठकीतील महत्त्वाचे मुद्दे सादर केले. त्यात आजपर्यंत विद्यापीठात जमा होणाऱ्या ऑनलाईन पेमेंटसाठी वापरण्यात येणारे IDFC बँकेच्या पेमेंट गेट वे ऐवजी HDFC बँकेच्या पेमेंट गेट वे चा वापर केल्यामुळे online transaction चे पैसे त्याच दिवशी विद्यापीठाच्या बँक खात्यावर जमा होतात आणि विद्यापीठाचे AG Audit ने केलेल्या 2024 पर्यंतच्या आक्षेपांवर समाधानकारक उत्तर दिल्यामुळे फक्त 9 लेखा परीक्षण आक्षेप बाकी आहेत. त्यांचेही सादरीकरणाचे काम सुरू आहे. येत्या कालावधीत त्यांचेही समाधानकारक उत्तरे देऊन सर्व ऑडीट पॅरांचे निराकरण करण्यात येईल. याबाबत सर्वांनी वित्त अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच सादर केलेल्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 195.3.6<br>वित्त विभाग | **दि. 29 ऑगस्ट 2024 रोजी आयोजित वित्त समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** — दि. 29 ऑगस्ट 2024 रोजी वित्त समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** — विद्यापीठाच्या वित्त अधिकाऱ्यांनी दि. 29 ऑगस्ट 2024 रोजी झालेल्या वित्त समितीचे इतिवृत्त सादर केले. त्यातील ठळक बाब म्हणजे विद्यापीठाच्या अध्ययन साहित्याच्या छपाईसाठी वेब फेड ऑफसेट निविदेअंतर्गत निविदेतील अटी व शर्तीची काटेकोर तपासणी करण्यात आली. प्रत्यक्ष भेटी देऊन उत्कृष्ट पुरवठाकारांकडून कमीत कमी दरांनुसार छपाईचे काम देण्यात आले. त्यामुळे विद्यापीठाचा मागील वर्षापेक्षा किमान 3 ते 4 कोटी रुपयांचा फायदा झाला. याबाबत सर्वांनी वित्त अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 195.3.7<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठ सेवेत सामावून घेतलेल्या 29 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतील अनियमितता शिथील करणेबाबतच्या समितीची शिफारशी मा. व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....**<br>**टिपणी** — **अ)** विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर विद्यापीठाच्या कायद्यातील उद्दीष्टांची प्रतिपूर्ती करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाबाबत निर्धारित आकृतीबंध उपलब्ध नसल्याने विद्यापीठाचा आकृतीबंध गरजेनुसार हळूहळू विकसित करण्यात आला. त्या दरम्यानच्या काळात सन 1994 ते 2004 या कालावधीत काम करीत असलेल्या रोजंदारी व करार पद्धतीने काम करत असलेल्या ज्या कर्मचाऱ्यांना विद्यापीठ सेवेत टप्याटप्याने सामावून घेण्यात आले होते. त्या पदांच्या नियुक्तीतील अनियमितता शिथील करण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाने समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने 31 पदांच्या नियुक्तीतील अनियमितता शिथील करण्यासाठी समितीची बैठक दि. 22 व 23ऑगस्ट 2024 रोजी आयोजित करण्यात आली |

होती. या बैठकीत खालील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतील अनियमितता शिथील करावी अशी शिफारस मा. व्यवस्थापन मंडळास केलेली आहे.

| | |
|---|---|
| 1. श्री. गुलाब रामदास अहिरे | 16. श्री. युवराज काबू पगारे |
| 2. श्री. राजू मल्हारी जगताप | 17. श्री. विजयसिंह बबनसिंह रजपूत |
| 3. श्री. राजेश सिताराम बर्वे | 18. श्री. सुदाम कडुबा गोराडे |
| 4. श्री. भगवंत अनंत चुंबळे | 19. श्री. अनिल बाळकृष्ण निपळुंगे |
| 5. श्रीमती लीना अंबादास साळुंके | 20. श्री. जितेंद्र बन्सीलाल बोरसे |
| 6. श्री. राजेंद्र वासुदेव मांडगे | 21. श्री. पोपट महादेव गोतरणे |
| 7. श्रीमती हेमलता वसंत निकम | 22. श्रीमती मनिषा राजू जाधव |
| 8. श्री. अनंत शंकर जोशी | 23. श्री. रविंद्र शिवराम मोरे |
| 9. श्री. मनोहर निंबाजी सैंदाणे | 24. श्री. दत्तात्रय रघुनाथ फालक |
| 10. श्री. केशव मोतीलाल बुऱ्हाडे | 25. श्री. कैलास पंढरीनाथ सुर्यवंशी |
| 11. श्री. शरद दयाराम पाटील | 26. श्री. राजू नाना कटारे |
| 12. श्री. हेमंत एकनाथ मुसळे | 27. श्री. मनोहर गुलाबराव पाटील |
| 13. श्री. बाजीराव गंगाधर पवार | 28. श्री. विलास नथ्थू बेडसे |
| 14. श्री. महेश सोनू बल्लाळ | 29. श्री. तुकाराम मुकुंदा पाटील |
| 15. श्री. बाळू कारभारी साबळे | |

या समितीने वरील 29 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतील अनियमितता शिथिल करण्यासाठी समितीने सादर केलेला अहवाल व शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...

**टिपणी** – **ब**) तसेच वरील कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीसारखीच

30. श्री. संतोष शिवाजी साबळे 31. श्री. सचिन दगू कटारे

या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतही त्रुटी दर्शविल्या होत्या. या दोन कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतील त्रुटींची शहानिशा करण्यासाठी वरील समिती सदस्यांची बैठक दि. 02-09-2024 रोजी सकाळी 10.00 वा. रोजी आयोजित करण्यात आली. समितीने या दोन कर्मचाऱ्यांच्या त्रुटींशी संबंधित कागदपत्रांची तपासणी केली. त्यानुसार त्यांचा अहवाल तसेच त्यांच्या नियुक्तीतील अनियमिता शिथिल करण्याची शिफारस सादर केली. सदर अहवाल आणि शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...

**ठराव** – टिपणीत नमूद सर्व 31 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत मा. व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी सरांनी वस्तुस्थिती स्पष्ट केली. या कर्मचाऱ्यांची नियुक्ती ही 1994 ते 2000 या कालावधीतील असून विद्यापीठाची वाढती प्रगती, अपुरी मान्य पदसंख्या, आवश्यक मनुष्यबळ विचारात घेऊन तत्कालीन मा. कुलगुरुंनी तत्कालीन मा. व्यवस्थापन मंडळाच्या

| | | |
|---|---|---|
| | | मान्यतेने लेखी परीक्षा, मुलाखती, तांत्रिक अर्हता तपासून विहित सर्व परीक्षा घेऊन त्यांची नियुक्ती केली. परंतु शासनाने या कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीत त्रुटी दर्शविल्या होत्या.<br>या 31 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतील अनियमिततेची, नियुक्तीतील पडताळणी करण्यासाठी डॉ. अनिल कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली डॉ. व्ही.एन. मगरे, ॲड. सुनिता लाड, श्री. सुनिल विभांडीक, श्रीमती मीना वाडिले यांची समिती गठीत केली. या समितीने वरील 31 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीबाबत जाहिरातीपासून ते शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी सर्व कागदपत्रांची तपासणी केली. या समिती सदस्यांनी या 31 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतील त्रुटी क्षमापित करण्याचा अहवाल मा. कुलगुरुंच्या मार्फत मा. व्यवस्थापन मंडळास मान्यतेसाठी सादर केला.<br>सदर अधिकार शासनाने मा. व्यवस्थापन मंडळास प्रदान केले असून यापूर्वीही अशा प्रकारच्या नियुक्त्यांबाबत घेतलेल्या मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयास शासनाने मान्यता दिलेली आहे आणि अशा सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनही अदा होत आहे. तसेच या नियुक्त्यांबाबत शासनाच्या रोस्टरचाही अवलंब केला आहे. अशा सर्व शंकांचे निरसन झाल्यानंतर मा. व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी समितीने सादर केलेल्या 31 कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीतील अनियमितता (वयोधिक्य, शैक्षणिक अर्हता, नेमणुकीची कार्यपद्धती) शिथिल करण्याच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच या 31 कर्मचाऱ्यांकडून रु. 100/- च्या बाँडपेपरवर नोटरीकृत हमीपत्र घ्यावे. हमीपत्राचा मसुदा प्रशासनाने निश्चित करावा. समितीत काम करणाऱ्या डॉ. अनिल कुलकर्णी, डॉ. व्ही.एन. मगरे, ॲड सुनिता लाड, श्री. दिलीप भरड, श्री. सुनिल विभांडिक आणि श्रीमती वाडिले या सर्वांचे त्यांनी दिलेल्या योगदानाबाबत सर्वांनी अभिनंदन केले. |
| | 195.3.8<br>आस्थापना कक्ष | **विषय - करारावरील पुर्ननियुक्तीबाबतच्या मान्यतेबाबत ...**<br>**टिपणी** - विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) अन्वये एकूण 3 वर्षे कालावधीसाठी नियुक्ती करण्याची तरतुद आहे. त्यात मा. कुलगुरूंच्या अखत्यारीत 2 वर्षे व एक वर्ष व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात येते. सध्या करारावर कार्यरत असलेले श्री. शिवाजी हरीदास ताठे यांचा विद्यापीठ परिनियमानुसार मा. कुलगुरूंच्या अखत्यारीतील 2 वर्षे नियुक्ती कालावधी संपुष्टात आलेला आहे. पुढील 1 वर्षाच्या (6 महिने — 6 महिने) कालावधीसाठी मा. व्यवस्थापन मंडळाची मान्यता घ्यावी लागेल. मा. कुलगुरूंनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता दिलेली आहे. मा. व्यवस्थापन मंडळाच्या कार्योत्तर मान्यतेसाठी सादर ...<br>**ठराव** – श्री. शिवाजी ताठे यांच्या करारावरील पुर्ननियुक्तीस व्यवस्थापन मंडळाच्या वतीने सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | 195.3.9<br>आस्थापना कक्ष | **विषय – विद्यापीठ सेवेत कार्यरत असलेले आणि सेवानिवृत्त झालेले (नियमित सेवेतील) कर्मचाऱ्यांच्या संगणक अर्हतेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेस्तव सादर...**<br><br>**टिपणी** -<br><br>A. विद्यापीठातील ज्या कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाने घेतलेले अंतर्गत संगणक कौशल्य यशस्वीरित्या पूर्ण करून अंतर्गत संगणक कौशल्य श्रेणीपत्रक सादर करतील अशा कर्मचाऱ्यांची हे श्रेणीपत्रक संगणक अर्हतेकरिता गृहित धरून सदरची अट शिथिल करून आश्वासित प्रगती योजनेचे लाभ तसेच वेतनवाढीबाबतचे लाभ संबंधित कर्मचाऱ्यांना लागू करण्यास मान्यता मिळावी.<br><br>B. सोबतच्या यादीतील (परिशिष्ट-9) 15 सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात आलेली आहे. मात्र दि.3.3.1999 च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या 5 संस्थामधील संगणक परीक्षा उत्तीर्ण केलेल्या नसतील अथवा विद्यापीठाने अंतर्गत संगणक कौशल्य यशस्वीरित्या पूर्ण केलेले नसेल अशा कर्मचाऱ्यांना या संगणक अर्हतेबाबत **विशेषबाब म्हणून सूट** देऊन त्यांची आश्वासित प्रगती योजनेचा लाभ व इतर अनुषंगीक लाभ मंजूर करण्यास मान्यता मिळावी.<br><br>C. विद्यापीठ सेवेत जे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी सध्या कार्यरत आहे. मात्र ज्या कर्मचाऱ्यांचे वय वर्ष 50 पूर्ण झालेले नाही अशा कर्मचाऱ्यांकडून सदरचे संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर करण्याबाबत त्या संबंधित कर्मचाऱ्यांना कळविण्यास मान्यता मिळावी.<br><br>D. उच्च व तंत्र शिक्षण, विभाग यांचेकडील क्रमांक:-संकीर्ण-2015/प्र.क्र.17/5/विशि-1, दि.13/08/2019 रोजीचे पात्रानुसार प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार कर्मचाऱ्यांच्या बाबतीत असलेल्या अनियमितता शिथील करण्याची कार्यवाही विद्यापीठाने विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने उचित व जाणीपूर्वक निर्णय घेऊन करणेबाबत कळविले आहे. त्यानुसार विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचारी आणि सध्या सेवेत कार्यरत असलेले शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता विहित मुदतीत यशस्वीरित्या पूर्ण केलेली नसल्यास अशा कर्मचाऱ्यांचे वय वर्ष 50 होण्यापूर्वीचे दिलेले वेतनवाढीचे लाभ कायम करण्यास मंजुरी मिळावी, ही विनंती. (परिशिष्ट - 8)<br><br>उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ सादर.... |

| | | |
|---|---|---|
| | | **ठराव** — विषयाच्या टिपणीमधील नमूद सर्व वस्तुस्थिती लक्षात घेता सदर 26 कर्मचाऱ्यांकडून संगणक अर्हता पूर्तता केली गेली नाही. परंतु हे सर्व कर्मचारी कार्यालयात संगणक उत्तमरित्या वापरत होते. त्यातील 15 कर्मचारी सेवानिवृत्तही झालेले आहेत.<br>या शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता विहित मुदतीत पूर्ण केली नव्हती. तरीही त्यांना वेतनवाढीचे लाभ देण्यात आलेले आहेत. अशा सर्व सेवानिवृत्त व कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचे वय वर्ष 50 होण्यापूर्वीचे दिलेले वेतनवाढीचे लाभ कायम करण्यास तसेच त्यांचा विहित कालावधी विशेषबाब म्हणून सूट देऊन क्षमापित करून या कर्मचाऱ्यांना सेवेतील सर्व लाभ देण्यास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सर्व सदस्यांनी सर्वानुमते मान्यता देण्यात आली. या कर्मचाऱ्यांकडून / अवलंबितांकडून भविष्यात याबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास ते स्वत: जबाबदार राहतील या आशयाचे रु. 100/- च्या नोटरीकृत बाँडपेपरवर हमीपत्र घ्यावे. हमीपत्राचा मसुदा प्रशासनाने निश्चित करावा. तसेच सदर निर्णय शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागास कळविण्यात यावा, अशी शिफारस केली. |
| | 195.3.10<br>वित्त विभाग | **शिक्षक व शिक्षकेतर पदावर नियमितरित्या नियुक्त कर्मचाऱ्यांना अतिरिक्त वेतनाची अनुज्ञेयता निश्चित करणेबाबत.**<br>**टिपणी** : सद्यस्थितीत विद्यापीठात नियमित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत कमी प्रमाणात आहे. येत्या काळात सेवा निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या सुध्दा अधिक आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोग, राज्यशासन, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020, विद्याशाखांची वाढलेली संख्या नव्याने निर्माण करण्यात येणारे केंद्र / विभाग / शिक्षणक्रमाची वाढलेली संख्या लक्षात घेता सद्यस्थितीत उपलब्ध मनुष्यबळ अत्यंत अपुरे आहे. त्यातच शासनाकडून नियमित पदावर भरती करण्याकरिता अद्याप परवानगी मिळालेली नाही. त्यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांना अधिकच्या 2-3 जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात.<br>दि. 28 फेब्रुवारी 2024 रोजी आयोजित व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत याबाबत पुढीलप्रमाणे चर्चा झाली होती. वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार, नव्याने स्थापन झालेल्या विद्याशाखांमधील सेवानिवृत्तांच्या नियुक्त्या, अतिरिक्त पदभार स्विकारणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतरअधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या मोबदल्याबाबत सविस्तर चर्चा झाली. तसेच याबाबत असेही ठरले की, सदर मोबदला हा जुलै 2023 पासून देण्यात यावा व वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार व इमरटस प्राध्यापक पदावर नियुक्त झालेल्या शिक्षकांचे मानधन हेरु. 75,000/- प्रतिमाह असावे. याबाबत मा. कुलगुरु महोदयांनी मान्य केलेल्या मानधन ठरविण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या दि. 30.08.2024 बैठकीत पुढील प्रमाणे ठरले आहे.<br>विविध शिक्षक व शिक्षकेतर पदावर काम करणाऱ्या ठराविक वेतन स्वरुपाच्या सर्व कर्मचाऱ्यांचा मोबदला ठरविलेला असून तो या बैठकीत स्वतंत्र विषयाने सादर झालेला आहे. |

केवळ अतिरिक्त मानधन देण्याबाबतचा विषय उरला होता. त्यामुळे याबाबत पुढीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

01 एकापेक्षा अनेक अतिरिक्त कार्यभार सांभाळत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना एकाच अतिरिक्तपदासाठीचा अतिरिक्त मोबदला देण्यात येईल.

02 सदर अतिरिक्त मोबदला हा जुलै 2023 पासून पुढे लागु राहील.

03 संचालक, विभागप्रमुख, केंद्रप्रमुख इत्यादी पदांचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जो किमान सहयोगी प्राध्यापक किंवा त्यापेक्षा वरील पदावरील असावा तर शिक्षकेतर अधिकारी हा जो की, एस – 23 या वेतनस्तर मध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यास रु. 5,000/- प्रतिमाह तर सहायक प्राध्यापक व एस-20 वेतनस्तरावर काम करणाऱ्या शिक्षकेतर अधिकाऱ्यांना अतिरिक्त मानधन रु. 3,000/- प्रतिमाह मिळेल. इतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अतिरिक्त पदभाराचा मोबदला रु. 1,500/- प्रतिमाह राहील.

04 अतिरिक्त पदभाराचे आदेश आस्थापना विभागाने रितसर निर्गमित केलेले असावेत.

05 अतिरिक्त कारभार देण्याचे अधिकार कर्मचाऱ्यांच्या क्षमतेनुसार मा. कुलगुरु महोदयांना असतील.

06 अतिरिक्त पदभाराचा मोबदला मागणी पत्रानुसार आदेश प्रति सहा महिन्याला एकदाच आस्थापना विभागाकडून निर्गमित होऊन वित्त विभागाकडे सादर व्हावेत.

07 अतिरिक्त पदभाराचा मोबदला हा केवळ नियमित अस्थापने वरील कायमस्वरुपी कर्मचाऱ्यांनाच देय असेल.

08 अतिरिक्त पदभाराचा मोबदला केवळ सहा महिन्यातून एकदाच वेतन देयका सोबत वित्त विभागाकडून अदा करण्यात येईल.

09 अतिरिक्त पदभाराच्या मोबदलाआयकर गणनेकरिता पात्रअसेल.

उपरोक्त प्रमाणे अतिरिक्त पदभाराचा मोबदला अदायगीबाबत नियमावली मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत निर्णयास्तव सविनय सादर.

**ठराव** – सदर प्रस्ताव व त्यानुसार नियमावलीवर सविस्तर चर्चा होऊन त्यास मा. व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

195.3.11 सभा व दप्तर कक्ष

**विद्यापीठाने खालीलप्रमाणे विविध संस्थांशी विद्यापीठाच्या विहित कार्यपद्धतीनुसार 2024 मध्ये केलेले सामंजस्यकरार मा. व्यवस्थापन मंडळासमोर मान्यतेसाठी सादर ......**

| क्र. | संस्थेचे नाव | कराराचा तपशील |
|---|---|---|
| 1 | R.E.R.F. माऊंट अबू येथील संस्था | मूल्यशिक्षणाअंतर्गत विविध पदविका हे शिक्षणक्रमांची निर्मिती आणि अंमलबजावणी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | 2 | Yashaswi Skills Limited – Dr.BabasahebAmbedkar Earn and Learn Scheme | डॉ. बाबासाहेब आंबेडकर कमवा व शिका योजनेअंतर्गत विविध कौशल्य विकास शिक्षणक्रमांची निर्मिती आणि अंमलबजावणी |
| | | 3 | Discover Wellness Pvt. Ltd., Pune | Health and Wellness निगडीत विविध शिक्षणक्रमांची निर्मिती आणि अंमलबजावणी |
| | | 4 | Maha Swayam Platform & Portal – Maharashtra State | महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांसाठी Maha Swyam Platform Develop करणे. |
| | | 5 | Aarav Educational& Employment Research Organization, Pune | निरंतर शिक्षण विद्याशाखेतील कौशल्याधिष्ठीत विविध पदविका शिक्षणक्रम |
| | | 6 | MKCl – Learn Live Yash Ex | Academic Life Cycle Management शिक्षणक्रमांची निर्मिती आणि अंमलबजावणी |
| | | 7 | MKCL – Online Admission 2024-25 | विद्यापीठाच्या 2024-25 या वर्षाच्या ऑनलाईन प्रवेशाबाबतची कार्यवाही |

**ठराव** – सदर सर्व सामंजस्य करारांना मा.व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

195.3.12 आस्थापना कक्ष

**करारावरील एकत्रित वेतनावर असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या मानधनाबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ व निर्णयार्थ सादर....**

**टिपणी** - करारावरील एकत्रित वेतनावर असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या मानधनाबाबत आस्थापना कक्षाने त्या संदर्भातील प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळापुढे सादर केला होता. त्यास मा. व्यवस्थापन मंडळ सभा दिनांक 29/11/2014 ठराव क्र. 146.4.14 अन्वये मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार आजतागायत मानधन अदा केले जात आहे.

सदरचे मानधन हे 2014 मध्ये मान्य करण्यात आले असल्यामुळे सदरचे दर कमी आहेत. तसेच अधिकारी /कर्मचारी यांची एकत्रित वेतनात वाढ करण्याची मागणी होत असल्या कारणाने मा. कुलगुरु महोदयांनी याबाबतची तपासणी करण्यासाठी समिती सदस्य पुढीलप्रमाणे मा. डॉ. संजिवनी महाले – अध्यक्ष (तथा व्यवस्थापन मंडळ सदस्या), मा. श्री. दिलीप भरड – सदस्य (कुलसचिव), मा.डॉ. गोविंद कतलाकुटे – सदस्य ( वित्त अधिकारी), श्री. सुनिल निकम – सदस्य सचिव ही समिती गठीत केली होती. सदर समितीचे इतिवृत्त मा. व्यवस्थापन मंडळासमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर....

**ठराव** – समितीने सादर केलेले इतिवृत्त आणि शिफारसींना मा. व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| | 195.3.13<br>अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र | **CIQA Annual Report 2023-24 वार्षिक अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या समोर मान्यतेस्तव सादर...**<br>**टिपणी** - CIQA Annual Report 2023-24 वार्षिक अहवाल दूरशिक्षण परिषदेच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात आले आहे. सदरचा अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाच्या समोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** — अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्र यांनी सादर केलेला 2023-24 या वर्षाचा वार्षिक अहवाल मा. व्यवस्थापन मंडळाने सर्वानुमते मान्य केला. |
| 195.4 | | **मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळचे विषय** |
| | 195.4.1<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील प्र-कुलगुरूंच्या परिनियमाच्या कार्यवाहीबाबतचा विषय मान्यतेस्तव सादर**<br>**टिपणी** — विद्यापीठातील प्र-कुलगुरू पद व कार्यकाळ हा इतर विद्यापीठातील प्र-कुलगुरूंच्या पद आणि कार्यकाळाशी समकक्ष असण्याबाबत परिनियम करण्यात आला. सदर परिनियम मा. राज्यपाल तथा कुलपती यांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला होता. सदर परिनियमास मा. कुलपतींनी मंजुरी दिली. सदर परिनियमानुसार प्रत्यक्ष कार्यवाही करण्याची मान्यता घेण्यास्तव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** — परिनियमातील दुरुस्तीस मा. राज्यपाल महोदयांनी दिलेल्या मंजुरीबाबत सर्व सदस्यांनी मा. कुलगुरू, मा. प्र-कुलगुरू यांचे अभिनंदन केले. तसेच पुढील अनुषंगिक कार्यवाही करण्यासाठी सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 195.4.2<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठात शिक्षकांची 33 पदे करार पद्धतीने भरण्याचा विषय मान्यतेसाठी सादर**<br>**टिपणी** — विद्यापीठास पुढील शैक्षणिक वर्षाकरिता आवश्यक असलेल्या शिक्षणक्रमांना प्रवेश देण्याकरीता, सदर शिक्षणक्रमांना UGC ची मान्यता घेणे आवश्यक आहे. अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्रामार्फत या संदर्भातील कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. शिक्षणक्रमांसाठी UGC च्या निकषांनुसार आवश्यक शैक्षणिक मनुष्यबळ (Asst. Professor / Coordinatio (Academic)) उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या विद्याशाखानिहाय एकूण 33 पदे करारावर भरणे आवश्यक आहे. या भरतीसाठी शैक्षणिक (संयोजक) यांची जाहिरात क्र. YCMOU/EST/2024/01 मध्ये नमूद केलेल्या अटी, शर्तीनुसार आणि सदर जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे प्रती महिना एकत्रित वेतन रु. 57,700/- इतक्या वेतनावर सदरची पदे भरण्यास तसेच प्रस्तावित विविध शिक्षणक्रमांच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचा असल्याने, आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासदंर्भाचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** — मा. कुलगुरूंनी याबाबत सद्यस्थितीतील शैक्षणिक पदांची वस्तुस्थिती तसेच येऊ घातलेले विविध नवीन शिक्षणक्रम आणि UGC चे निकष यांविषयी माहिती दिली. त्यामुळे वरील करारावरील नियुक्त्यांची गरज आणि तातडी लक्षात घेऊन वरील 40 पदांच्या पदभरतीच्या प्रस्तावास मा. व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांनी सर्वानुमते मान्यता दिली. |

| | |
|---|---|
| 195.4.3<br>व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखा | **मा. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना विद्यापीठात अंमलबजावणी प्रस्ताव**<br>**टिपणी** — मा. मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची विद्यापीठात अंमलवजावणी करावी याबाबत मा. कुलगुरू यांनी मार्गदर्शक सूचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने व्यावसायिक शिक्षण व कौशल्य विकास विद्याशाखेने महाराष्ट्र शासनाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थाळावर विद्यापीठाची नोंदणी केली. तद्नंतर विद्यापीठाला 40 पदवीधर प्रशिक्षणार्थी नियुक्त करण्यासाठी शासनाच्या याच संकेतस्थळावरून 30 ऑगस्ट 2024 पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. तद्नंतर 495 प्राप्त अर्जातून एकूण 40 प्रशिक्षणार्थीची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन या प्रशिक्षणार्थीना त्यांच्या बँक खात्यात दरमहा रु. 10,000/- विद्यावेतन अदा करेल. निवड करण्यात आलेले प्रशिक्षणार्थी मुख्यालय तसेच विभागीय कार्यालयात प्रशिक्षणार्थी म्हणून कार्य करतील. सदर योजना विद्यापीठ राबवित आहे. याबाबत व्यवस्थापन मंडळास अवगत करणे व योजनेस कार्यात्तर मंजुरी मिळावी यास्तव सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेसमोर सादर ...<br>**ठराव** — मा. कुलगुरूंनी महाराष्ट्र शासनाच्या या योजनेविषयी माहिती सांगितली. ही योजना विद्यापीठाने त्वरित राबविण्यास सुरुवात केली याबाबत सर्वांनी मा. कुलगुरूंचे अभिनंदन केले. तसेच सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली. |
| 195.4.4<br>सभा व दप्तर कक्ष | **विद्यापीठातील मूल्यमापन केंद्रातील प्र-संचालक यांच्या संचालक या पदनामाबाबतच्या कार्यवाहीबाबत ...**<br>**टिपणी** — विद्यापीठातील मूल्यमापन केंद्रातील सहयोगी प्राध्यापक डॉ. सज्जन थूल हे संचालक पदाचा कार्यभार सांभाळत आहेत. त्यांचे पदनाम सध्या प्राध्यापक व अतिरिक्त कार्यभार प्र-संचालक असे आहे. त्यांचा अनुभव आणि जबाबदाऱ्या लक्षात घेता संचालक, मूल्यमापन विभाग असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर ...<br>**ठराव** — संचालक, मूल्यमापन विभाग हे वैधानिक पद नाही. पदनामाचा उल्लेख परिनियमात आहे किंवा नाही याबाबत शहानिशा करावी असे सर्वानुमते ठरले. तपासून पहावा. जर परिनियमात उल्लेख नसेल तर परिनियम सुधारणा समितीकडे विषय वर्ग करण्यात यावा. परिनियमास मान्यता मिळाल्यानंतर पदनाम सुधारण्यात यावे व त्यानुसार सदर विषय व्यवस्थापन मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |
| 195.4.5<br>वित्त विभाग | **आर्थिक वर्ष 2023-24 नुसार विद्यापीठास रु. 110 कोटी खर्चापेक्षा जमा जास्तीची झाल्याने आयकर कायद्यातील नियमानुसार सदर जास्तीची रक्कम पुढील पाच आर्थिक वर्षात भांडवली खर्चावर करण्याबाबतची हमी आयकर कार्यालयास देण्याबाबतचा ठराव मंजुर करणेबाबत...**<br>**टिपणी** — विद्यापीठाचे सन 2023-24 या आर्थिक वर्षात जमा व खर्चाच्या विवरणांचे अवलोकन केले असता रु. 110 कोटी विद्यापीठाकडे खर्चापेक्षा जमा जास्त झालेली दिसून येत आहे. सदर जास्तीची जमा ही सन 2023-24 या आर्थिक वर्षात भांडवली खर्चाकरिता हाती |

| | | |
|---|---|---|
| | | घेतलेल्या विविध बांधकामे व इतर बाबींवर होणाऱ्या खर्चांची देयके ही त्या वर्षात खर्ची पडली नाहीत. तसेच त्या वर्षाचा परीक्षा आयोजनाचा खर्च व इतर खर्च सन 2024-25 या आर्थिक वर्षात पडला आहे.<br>आयकर कायदा 1961 मधील कलम 11(2)(a) व नियम 17 (2) नुसार फॉर्म न. 10 विद्यापीठाने आयकर कार्यालयाकडे दाखल केला असून, त्यात रु. 110 कोटी आर्थिक वर्ष 2024-25 ते 2028-29 या पाच वर्षांच्या दरम्यान भांडवली खर्चावर करण्याचे निश्चित केले असल्याच्या आशयाचा फॉर्म सादर केलेला आहे.<br>**ठराव** – उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक पुढीलप्रमाणे ठराव पारित करित आहे की, आयकर कायदा 1961 मधील कलम 11(2)(a) व नियम 17 (2) नुसार सादर केलेल्या फॉर्म 10 मध्ये दर्शविलेले रु. 110 कोटी विद्यापीठाच्या परिसर विकासाकरिता होणाऱ्या भांडवली खर्चावर सन 2024-25 ते 2028-29 या आर्थिक वर्षात खर्च करण्याची हमी देत आहे. ही बाब आयकर कार्यालयास नियमानुसार कळविण्याबाबत सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | | वरील सर्व विषयांवर समाधानकारक चर्चा होऊन ठराव करण्यात आले. मा. अध्यक्षांच्या मान्यतेने सर्व उपस्थित सदस्यांचे मा. व्यवस्थापन मंडळाचे सचिव तथा कुलसचिव यांनी आभार मानले व सभा समाप्त करण्यात आली. |

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलसचिव तथा सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**